Pandit Dindayal Upadhyaya Education Society’s

# SHRI SANT SAVTA MALI GRAMIN MAHAVIDYALYA PHULAMBRI

## RESEARCH & DEVELOPMENT CELL COMMITTEE

## YEAR 2024-25

## उपक्रम

१. संशोधन व विकास कक्षाच्या वतीने चर्चासत्र, कार्यशाळा व प्रकल्प यासाठी निधी मिळण्यासाठी डॉ.बा. आ.म.विद्यापीठाला प्रस्ताव पाठवण्यासंबंधी प्राध्यापकांसाठी दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी सूचना काढली.

२. महाविद्यालयातील संशोधन व विकास कक्षाच्या वतीने दिनांक ५ सप्टेंबर २०२४ रोजी प्रा. डॉ. दीपक भुसारे यांचे 'संशोधनातील नवीन संधी' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष टकले हे होते. सूत्र संचलन कु. पायल तावरे हिने केले. आभार प्रा.डॉ रामकिशन लोमटे यांनी मांडले.



प्रा. डॉ. दीपक भुसारे व्याख्यान देताना



प्रा. डॉ. दीपक भुसारे व्याख्यान देताना

३. शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ मधील सर्वेक्षण संबंधीची माहिती संकलित करण्यासंबंधी सूचना काढली. तीन विभागांची माहिती खालील प्रमाणे प्राप्त झाली..

# SURVEY COLLECTION

| Sr. No. | Title of Survey Report |
|---|---|
| * | DEPARTMENT OF SOCIOLOGY |
| 1 | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पोषण स्थितीचा अभ्यास |
| * | DEPARTMENT OF ECONOMICS |
| 2 | कोविड १९ चा पर्यटन अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम |
| * | DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE |
| 3 | हवामान बदलाचा गणोरी गावातील पिक परिस्थितीवर झालेला परिणाम |

४. शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ मधील संशोधन व विकास कक्षाची पहिली बैठक दिनांक २२ ऑक्टोबर २०२४ रोजी घेण्यात आली.

५. 'स्थानिक सर्वेक्षण व संशोधन' - परिसंवाद:-

संशोधन व विकास कक्षाच्या पहिल्या बैठकीत ठरल्याप्रमाणे दिनांक २५ ऑक्टोबर २०२४ रोजी फुलंब्री परिसरातील स्थानिक सर्वेक्षण करण्यासंबंधी परिसंवाद घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयातील ११ प्राध्यापक उपस्थित होते. कोणत्या विषयावर स्थानिक सर्वेक्षण होऊ शकते या विषयी प्रत्येकाने ५ मिनिटात आपले विचार मांडले. स्थानिक सर्वेक्षण करण्यासाठी प्राध्यापकांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने  हा परिसंवाद आयोजित करण्यात आला.



‘स्थानिक सर्वेक्षण व संशोधन’ – परिसंवादात सहभागी प्राध्यापक

६. शैक्षणिक वर्ष २०२४ – २५ मधील संशोधन व विकास कक्षाची दुसरी बैठक दिनांक २० मार्च २०२५ रोजी घेण्यात आली. या बैठकीत असे ठरले की, स्थानिक सर्वेक्षण करण्यासाठी google फॉर्म चा वापर करावा. त्यासंबंधी माहिती हवी असेल तर डॉ. संदीप जगताप यांचे सहकार्य घ्यावे. या बैठकीत डॉ. मंजुषा नळगीरकर यांनी असा प्रस्ताव मांडला की महाविद्यालयात आचार्य कुल प्रबोधिनी अंतर्गत होणारे पेपर वाचन संशोधन व विकास कक्षामार्फत व्हावे. याला सर्व सदस्यांनी संमती दर्शविली.

सादरकर्ते
प्रा. डॉ. रामकिशन लोमटे

= ० =